आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार, दिनांक ०४ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं आवश्यक असल्याचं 'महिला सक्षमीकरण मेळाव्यात' राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन; उदगीर इथं विश्वशांती बुद्ध विहाराचं देखील राष्ट्रपतींच्या हस्ते लोकार्पण.
2. मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीचे ताबडतोब पंचनामे करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देष.
3. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारांचं उद्या शिक्षक दिनी होणार वितरण.
4. नागपुरात 'गणपती मूर्तींच्या' विसर्जनासाठी 419 कृत्रिम हौदाची व्यवस्था, पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महानगरपालिका सज्ज.

****

राष्ट्रपती

प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं आवश्यक असून, त्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली आहे. लातूर जिल्हयात उदगीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या बोलत होत्या. प्रत्येक क्षेत्रात महिलांची सक्रीय भागीदारी वाढवण्यासाठी बचत गटांची भुमिका महत्वाची असल्याचं त्या म्हणाल्या. महिला शिक्षित झाली, तर संपूर्ण कुटुंब आणि भावी पिढी शिक्षित होते, हेच समीकरण सक्षमीकरणासाठी देखील लागू होतं, असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं. राज्य सरकार महिलांचं आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करत असल्याचं सांगून त्यांनी, महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष देण्याचं आवाहन केलं. यावेळी महाराष्ट्राच्या इतिहासातील महान स्त्रियांचा त्यांनी उल्लेख केला -

*(होल्ड बाईट - **54** सेकंद)*

*देश के इतिहास में महाराष्ट्र के महिलाओं के नाम स्वर्णाक्षरों में अंकित है, वीरमाता जीजाबाई ने शिवजी महाराज को सदा मातृभूमि की सेवा जनकल्याण के लिए समर्पित रखने के लिए प्रेरणा दी थी । सावित्रीबाई फुले ने महिलाओ के अधिकारों के रक्षा के लिए संघर्ष किया और लड़कियों के शिक्षा के लिए अनेक कदम उठाये थे । संत बहिणाबाई इसी भूमि की एक महान संत थी । महान कवियत्री बहिणाबाई*

*चौधरी जिन्होंने मानव समाज विशेषकर महिलाओ के जीवन का चित्रण करने वाली कविताएं लिखी वे भी इसी धरती की बेटी थी । ऐसे महान माताओ से प्रेरणा लेकर हमारी सभी बहने निरंतर आगे बढ़ेगी और देश की विकासगाथा लिखेगी ये मेरा विश्वास है ।*

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन, मंत्री संजय बनसोडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यावेळी उपस्थित होते. लाडक्या बहिणींचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रपती स्वत: आल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत एका महिलेला तीन गॅस सिलिंडर देणार असल्याचं सांगून मुख्यमंत्र्यांनी, राज्य सरकारच्या महिला आणि शेतकर्यांसाठीच्या इतर योजनांची माहिती दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद होणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन सरकार वाटचाल करत असल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. उदगीर तालुक्याला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याची, तसंच उदगीर इथं वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची मागणी मंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी केली. तत्पूर्वी राष्ट्रपतींनी उदगीर इथं विश्वशांती बुद्ध विहाराचं उद्घाटन केलं. कोनशिलेचं अनावरण तसंच फीत कापून बुद्ध विहाराचं लोकार्पण करण्यात आलं. यावेळी राष्ट्रपतींनी गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस, तसंच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केलं. बुद्ध विहार आणि मेडिटेशन केंद्र उभारल्याबद्दल त्यांनी राज्य सरकारचं कौतुक केलं. दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उदगीर तालुक्यातील हेर आणि लोहारा शिवारात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

****

नुकसानीचे पंचनामे

मुसळधार पावसामुळे नुकसान झालेल्या विदर्भासह इतर भागातील जिल्हे किंवा तालुक्यांमध्ये नुकसानीचे पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. पिकांचे झालेले नुकसान, घरांची पडझड, पशुधनाची हानी अशा सर्व बाबींची माहिती घेण्यात यावी, यासंदर्भात त्वरित पंचनामे करण्यात यावेत. अतिवृष्टीमुळे तात्पुरते स्थलांतर केलेल्या लोकांना सर्व आवश्यक सुविधा देण्यात याव्यात. त्यांना आवश्यक ती सर्व मदत त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना दिल्या आहेत. विभागीय आयुक्त, जिल्हा

प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन विभाग, स्थानिक नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायती, पोलीस प्रशासन आदी सर्वांनी समन्वयाने यासाठी कामकाज करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. आपत्ती व्यवस्थापन कक्ष 24 तास खुला ठेवावा, याद्वारे मदत आणि पुनर्वसनाचे सनियंत्रण करावे, स्थलांतर केलेल्या लोकांसाठी चांगल्या दर्जाचे तात्पुरते निवारे उभे करावेत, त्यांना कपडे, अन्न, शुद्ध पाणी, औषधे इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचा ताबडतोब पुरवठा करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

****

खा.धैर्यशील पाटील

राज्यसभेवर निवडून गेलेले भाजपचे धैर्यशील पाटील यांचा शपथविधी आज झाला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यत्वाची शपथ दिली. किरण चौधरी, रामेश्वर तेली, जॉर्ज कुरियन, अभिषेक मनु सिंघवी या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधीही आज झाला.

****

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

देशाची निर्यात जर वाढवायची असेल तर आपल्याला लॉजिस्टिक खर्च कमी करावा लागेल, त्यासाठी आपल्याला इंधनाचे इतर पर्याय निवडावे लागतील, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत फिक्कीच्या वतीनं आयोजित दुसऱ्या टनेलिंग इंडिया परिषदेत ते बोलत होते. समुद्राजवळ पूल उभारताना बांधकामात गंजरोधक स्टेनलेस स्टिलचा वापर व्हायला हवा, असं सांगून गडकरी यांनी, राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवरायांचा पुतळा तयार करण्यासाठी स्टेनलेस स्टिल वापरलं असतं तर तो कधीच कोसळला नसता, असं मत व्यक्त केलं.

****

एसटी बैठक

राज्य परिवहन महामंडळ - एसटी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळावं यासह अन्य मागण्यांसाठी राज्यातल्या एसटी कर्मचाऱ्यांनी कालपासून बेमुदत संप पुकारला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कृती समितीच्या सदस्यांसोबत आज मुंबईत बैठक बोलावली आहे. आज होणाऱ्या चर्चेतून मार्ग काढू, कर्मचाऱ्यांनी संप करु नये, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे. तसंच ऐन

सणासुदीच्या तोंडावर प्रवाशांची गैरसोय होईल, अशा प्रकारे कोणतीही कृती करू नये, असं आवाहन, राज्य मार्ग परिवहन महामंडळनं आपल्या कर्मचाऱ्यांना केलं आहे.

****

उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या गुरुनानक भवन इथं उद्या शिक्षक दिन समारंभात या पुरस्कारांचं वितरण होणार आहे. विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान नागपूरचे संचालक डॉ. प्रेम लाल पटेल कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. यावर्षी एस.बी. सीटी महाविद्यालय उमरेड रोड, इथले प्राचार्य डॉ. सुजित गजाननराव मेत्रे यांना डॉ. आर कृष्णकुमार सुवर्णपदक पुरस्कार घोषित झाला आहे.उत्कृष्ट प्राचार्य -शहरी विभाग- जी.एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे प्राचार्य डॉ.सचिन पी. उंटवाले. उत्कृष्ट प्राचार्य (ग्रामीण विभाग) सूर्योदय कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी विहीरगावचे प्राचार्य डॉ. विठ्ठल गुलाबराव अराजपुरे, याना जाहीर झाला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेतून उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. नंदकिशोर एन. करडे, यांना तर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतून मातृ सेवा संघ इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल वर्क नागपूर इथले डॉ.प्रिन्स अजयकुमार तेजराम आगाशे, याना प्राप्त झाला आहे. विद्यापीठ शैक्षणिक विभागातून उत्कृष्ट संशोधक पुरस्कार, विद्यापीठाच्या औषधी निर्माणशास्त्र विभागातील डॉ. विना एस. बेलगमवार, आणि सेंट विन्सेंट पलोटी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी गावसी मानापूर येथील डॉ. मिनहाज अहमद ए. रहमान, यांना घोषित झाला आहे. उत्कृष्ट लेखक पुरस्कार विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहीतीशास्त्र विभागातील डॉ. शालिनी आर. लिहितकर यांना तर उत्कृष्ट समाजकार्य पुरस्कार विद्यापीठाच्या व्यवसाय प्रबंधन विभागातील डॉ. राहुल श्याम खराबे यांना घोषित झाला आहे.

****

कृत्रिम विसर्जन टँक

येत्या ७ सप्टेंबर रोजी गणरायांचं आगमन होत आह. त्यासाठी शहरात नागपूर महानगरपालिकेकडून विविध सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. शहरात एकूण ४१९ कृत्रिम विसर्जन हौदाची व्यवस्था करण्यात आली आहे. तलावांच्या संरक्षणासाठी मनपातर्फे घरगुती गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम विसर्जन टँकची व्यवस्था विविध प्रभागात करण्यात आली आहे. यात कच्छीवीसा

ओसवाल भवन, गांधीसागर तलाव, सोनेगांव तलाव येथे मोठे कृत्रिम टँक निर्माण करण्यात आले आहेत. तर सार्वजनिक गणेश मंडळासाठी कोराडी इथं विसर्जन टँकची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय सेट्रिंगचे ३३१, रबरीचे 31खड्डे कॉक्रीटचे 3 आणि फिरते 22 टँक राहणार आहेत. दीड दिवसाच्या गणेश विसर्जनासाठी 7 झोनमध्ये 30 कृत्रिम टंकची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये लक्ष्मीनगर येथे 2 ठिकाणी, धरमपेठ येथे 7 ठिकाणी, हनुमान नगर आणि सतरंजीपुरा येथे 2 ठिकाणी, तर धंतोली, नेहरुनगर आणि मंगळवारी इथं प्रत्येकी एका कृत्रिम टँकची व्यवस्था करण्यात आली आहे.

****

अजित पवार

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीक कर्जाचा पुरवठा करणाऱ्या प्राथमिक विकास सेवा संस्थांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. त्यादृष्टीने या संस्थांच्या शेतकरी भाग मर्यादेत २० हजार रूपयांवरून ५० हजार रुपयांपर्यंत टप्प्याटप्प्याने वाढ करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. ही वाढ करताना प्राथमिक विकास सेवा संस्थांसाठीचे निकष ठरविण्यासाठी सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शेतकरी भाग मर्यादेत वाढ करण्यासाठी प्राथमिक विकास सेवा संस्था तीन वर्षे सातत्याने नफ्यात असली पाहिजे. तसेच या बँकांनी किमान ६ टक्के लाभांश दिला असला पाहिजे, अशा निकषांचा त्यात समावेश करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

****

पॅरिस पॅरालिम्पिक अभिनंदन

पॅरिस पॅरालिम्पिक मध्ये आज पॅरा ॲथलेटिक्स पुरुष शॉटपुट F46 अंतिम फेरीत राज्याच्या सांगली जिल्ह्याचे शेतकरीपुत्र सचिन सर्जेराव खिलारीने 16.32 मीटरच्या सर्वोत्तम थ्रोसह रौप्य पदकावर आपलं नाव कोरलं असून यासह भारताची पदक संख्या २१ झाली आहे. आज भारोत्तलनच्या महिला अंतिम फेरीत एस खातून पदकासाठी सहभागी होईल तरपुरुषांच्या ४९ वजनी गटात परमजीत कुमार सुवर्णपदकासाठी खेळेल.

****

हवामान

आज आणि उद्या संपूर्ण विदर्भात मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या दरम्यान तुरळक ठिकाणी

मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. दरम्यान, मागील तीन दिवसापासून वाशीम जिल्हयात झालेल्या पावसामुळे वाशिम शहराजवळील केकतउमरा शेत शिवारातील एकबुर्जी हा लघु जल संचय प्रकल्प १०० टक्के भरला असून त्याच्या सांडव्यावरून पाणी वाहत आहे. सांडवा पाहण्यासाठी येणाऱ्यांनी सतर्कता बाळगण्याच्या सूचना प्रशासनानं दिल्या आहेत. भंडारा जिल्हयात देखील पावसाची संततधार सुरु आहे. जिल्हयात बागायती शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. त्यामुळे कृषी विभागाने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

****